


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १३३ •मंगळवार, दि. १२ ऑगस्ट २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955



# उद्धव ठाकरे यांचे वक्तव्य, .... तर देवेंद्र फडणवीस यांना पळता भुई थोडी होईल



**मुंबई । प्रतिनिधी**

आज संपूर्ण महाराष्ट्र जागा झाला आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्यात शिवसेना रस्त्यावर उतरली आहे. सत्ताधाऱ्यांशी संघर्ष करायला मर्द लागतो, तो मर्द आपल्या शिवसेनेत आहे. भ्रष्टाचाऱ्यांचं करायचं काय? खाली डोकं वर पाय. पण यांना डोकं असेल तर ना, यांना नुसते पाय आहेत सुरत आणि गुवाहाटीला पळून जायला. असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला आहे.

दिल्लीमध्ये इंडिया आघाडीतर्फे विरोधी खासदारांचा मोर्चा निघाला आहे. तो पोलिसांनी अडवल्याचं समजतं आहे. या सत्ताधाऱ्यांनी महाराष्ट्र भ्रष्टाचाऱ्याच्या पहिल्या रांगेत बसवला आणि विकासाच्या रांगेत शेवटी बसवला आहे. यांचा कारभार जनताभिमुख नाही तर पैसे गिळणाऱ्याचं यांचं तोंड आहे. कुणी डान्सबार चालवतंय, कुणी बॅगा घेऊन बसलंय. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला काही वेळ नाही. देवेंद्र फडणवीस भाजपाची परंपरा पुढे चालवणारे आहेत असं वाटलं होतं. पण त्यांनी गैरवर्तन करणाऱ्यांना फक्त समज देऊन सोडून दिलं आहे. भ्रष्टाचाऱ्यांविरोधात पुरावे असूनही सोडून देणार असाल तर मग धनकड कुठे आहेत याचंही उत्तर द्या. असंही उद्धव ठाकरे म्हणाले. धनकड यांचा राजीनामा का घेतला? हे कळलेलंच नाही. त्यांना तडकाफडकी काढून गायब केलं. धनकड यांना समज का दिली नाही? असाही प्रश्न उद्धव ठाकरेंनी विचारला.

### • चीनचा पॅटर्न भारतात राबवला जातो आहे ?

चीनमध्ये कळत किंवा नकळत सरकारमध्ये कुणी काही बोललं तर तो माणूस गायब होतो. उपराष्ट्रपती आहेत कुठे? ते तरी दाखवा. त्यांची प्रकृती बिघडली असेल तर ते कुठल्या रुग्णालयात आहेत? की तुम्ही त्यांचं ऑपरेशन केलं? याचं उत्तर द्या असंही उद्धव ठाकरे म्हणाले.. आज मी सगळ्यांना म्हणजेच सगळ्या शिवसैनिकांना सांगतोय मोदींनी जशी चाय पे चर्चा केली होती तशी तुम्ही आता लोकांशी चर्चा करा. आता भ्रष्टाचार पे चर्चा करा. भ्रष्टाचारी मंत्री जोपर्यंत हाकलले जात नाहीत तोपर्यंत आपलं आंदोलन थांबणार नाही.

### • मला देवेंद्र फडणवीस यांची कीव येते आहे- उद्धव ठाकरे

मला देवेंद्र फडणवीस यांची कीव येते, तुमच्याकडे पाशवी बहुमत आहे, दिल्लीत तुमचे बाप बसले आहेत तरीही भ्रष्टाचाऱ्यांना तुम्ही काढून टाकत नाही? देवेंद्र फडणवीस यांनी काही भ्रष्टाचार केला नाहीये असं गृहीत धरु मग तुम्ही भ्रष्ट लोकांवर पांघरुण का घालता? भाजपा म्हणजे भ्रष्टाचारी जनता पक्ष त्यांच्याकडे अध्यक्ष करायला माणूस नाही. तसं भ्रष्ट मंत्र्यांच्या जागीही कुणी मिळत नाही का? देवेंद्र फडणवीस यांनी सांगावं मला या लोकांना काढायचं आहे पण सहन होत नाही आणि सांगता येत नाही असा दबाव आहे. आमचं तर म्हणणं आहे की झुगारुन द्या सगळा दबाव. देवेंद्र फडणवीस हे चीफ मिनिस्टर नाहीत तर थीफ मिनिस्टर आहेत असं काँग्रेसने त्यांना म्हटलं आहे. चांगला शब्द दिला आहे. देवेंद्र फडणवीसांमध्ये थोडासा जरी स्वाभिमान असेल तर वरचा दबाव पाहू नका. कारण इथला दबाव वाढला तर तुम्हाला पळता भुई थोडी होईल.

# नारायणगड व सामाजिक कार्याच्या सदैव पाठीशी : खा.बजरंग सोनवणे

## जिल्ह्यात संत संमेलनाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**





श्री क्षेत्र नारायण गडाच्या वतीने महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शना खाली गोरगरीब व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या मुलांना शिक्षणा दरम्यान निवासासाठी उत्तम वस्तीगृहाची केलेली व्यवस्था वाखाण्याजोगी असून यामुळे अनेक विद्यार्थ्यांना लाभ मिळेल. श्री क्षेत्र नारायणगडाचा विकास व महंतांच्या सामाजिक कार्याला सदैव सक्षम पाठींबा असेल. लवकरच महंत शिवाजी महाराजांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात भव्य संत संमेलन आयोजित करणार असल्याची माहिती खा बजरंग बप्पा सोनवणे यांनी दिली आहे.

श्री क्षेत्र नारायण गडाच्या माध्यमातून बीड शहरा जवळील तळेगाव शिवारात महंत शिवाजी महाराज यांच्या कल्पनेतुन जवळपास दहा कोटी रुपये खर्च करून सर्व सोयींनीयुक्त सुंदर मुलांचे वस्तीगृह उभारले

▶▶ उर्वरित पान २ वर

# गोसावींच्या वरदहस्ताने नेकनूर बनतेय गोमांस तस्करीचा अड्डा

**बीड । प्रतिनिधी**

जनावरांची मोठी बाजारपेठ असलेल्या नेकनूर मध्ये गोवंशाची हत्या करून गोमांसाची तस्करी मोठ्या प्रमाणावर होत असल्याच्या घटना समोर आल्याने खळबळ माजली आहे. गोवंश हत्या विधेयकाची गळचेपी ठाणे प्रमुखाच्या वरदहस्ताने होत असल्याने संतप्त भावना व्यक्त होत आहेत.

नेकनूर पोलीस ठाणे हद्दीतील गावामधून जुगारासह बनावट व अवैध दारूचा पूर वाहू लागला आहे. शेतीमालावर दरोडे टाकणाऱ्यांचे आश्रयस्थान बनले आहे. माध्यमामधून तसेच जनतेकडून पोलीस अधीक्षकांपर्यंत याची तक्रार केली जात असली तरी पोलीस अधीक्षक नवनीत कांवत देखील याकडे दुर्लक्ष करत आहेत. याचाच परिणाम म्हणून ठाणे प्रमुख गोसावींना वरिष्ठांचा धाक वाटेना असा झाला आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कावत जरी प्रामाणिक अधिकारी असले तरी त्यांचा वचक कर्मचाऱ्यावर राहिलेला नसल्याने गुन्हेगारी घटनांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. अवैध धंद्यामधून मिळत असलेल्या कमाईचा लाभ वरिष्ठांपर्यंत पोहोचत असल्याने गोसावींना अभयदान मिळत असल्याची चर्चा जनतेत होऊ लागली

▶▶ उर्वरित पान २ वर



श्री. सोमेश्वर महादेव मंदिर बीड येथे तिसऱ्या सोमवारी भाविक भक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

# भरधाव ट्रकच्या धडकेत पत्नीचा मृत्यू, पतीने बाईकला बांधून नेला मृतदेह; सर्वांपुढे हात जोडूनही मिळाली नाही मदत

**नागपूर । प्रतिनिधी**




नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्गावर घडली माणुसकीला लाजवणारी घटना घडली आहे. अपघातात पत्नीचा मृत्यू झाल्यानंतर कोणीही मदत न केल्याने पतीवर मृतदेह बाईकवर घेऊन जाण्याची वेळ आली. माणुसकीला लाज आणणारी ही घटना कॅमेऱ्यात कैद झाली आहे. कारमधून जाणाऱ्या एका व्यक्तीने कॅमेऱ्यात ही घटना कैद केली. यानंतर हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

अपघातात मृत्यू पावलेल्या पत्नीचा मृतदेह दुचाकीवर बांधून नेतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.. मदत मागूनही मदत न मिळाल्याने हतबल पतीने मृतदेह दुचाकीवरून नेण्याचा निर्णय घेतला. माणुसकीला लाज आणणारा

▶▶ उर्वरित पान २

# तरुणी तृतीयपंथीयाच्या जाळ्यात अडकली; तृतीयपंथीयासह तिघांकडून बलात्कार

**बीड । प्रतिनिधी**



गुन्हेगारीच्या घटनांनी बीड जिल्हा चर्चेत राहत असल्याचं चित्र आहे. अशातच आणखी एक खळबळजनक धक्कादायक बातमी समोर येत आहे. काम देण्याची भुलथाप देत एका तृतीय पंथीयानं भयानक कृत्य केलं. एका २० वर्षीय तरूणीला आपल्या साथीदारांच्या हवाली केलं. नंतर आळीपाळीने तिघांनी तिच्यावर बलात्कार)केला. या प्रकरणी पोलिसांनी तृतीय पंथीयासह चौघांवर अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. ही घटना शनिवारी पहाटे घडली.या घटनेतील पीडिता (वय २०)

▶▶ उर्वरित पान २ वर

# यवतमाळ हादरले! तिसरी शिकणाऱ्या मुलीवर तिच्याच वर्गमित्राकडून अत्याचार

**यवतमाळ । प्रतिनिधी**



यवतमाळमध्ये अंगावर शहारा आणणारी घटना उघडकीस आली आहे. तिसरीत शिकणाऱ्या ८ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर तिच्याच वर्गातील मुलाने अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेने शाळा प्रशासनही हादरले असून मुलीच्या कुटुंबीयांना मोठा धक्का बसला आहे.

यवतमाळच्या जिल्हा परिषद शाळेत इयत्ता तिसरीत शिकणाऱ्या मुलीवर तिच्याच वर्गातील मुलाने अत्याचार केला. मिळालेल्या माहितीनुसार, मुलाने बाथरुममध्ये नेऊन तिच्यावर अत्याचार केला. तसंच, हे कृत्य करण्यासाठी एका मुलीनेही त्याला मदत केल्याचे समोर आले आहे. मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांत अल्पवयीन मुलगा आणि मुलीविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित मुलीला गुप्तांगाजवळ जखमा झाल्या होत्या.

▶▶ उर्वरित पान २ वर

# दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांचे दुष्काळमुक्त मराठवाड्याचे स्वप्न साकार करु: मुख्यमंत्री फडणवीस

**लातूर । प्रतिनिधी**




लोकनेते दिवंगत गोपीनाथराव मुंडे हे कर्तृत्ववान व संघर्षशील नेतृत्व होते. त्यांची कार्यकर्ता ते केंद्रीय मंत्रीपदापर्यंतची वाटचाल संघर्षमय होती. त्यांनी मराठवाडा दुष्काळमुक्त करण्याचे स्वप्न पाहिले. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मराठवाड्याच्या हक्काचे पाणी या भागात आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यासाठी कृष्णा खोऱ्यातील ७ टीएमसी पाणी मराठवाड्यात आणण्यासाठी यापूर्वीच मंजुरी दिली असून त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. आता गोदावरी खोऱ्यातील ५४ टीएमसी पाणी मराठवाड्यात आणणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच लातूर शहर विस्तारीत पाणी पुरवठा योजना आणि जिल्हा सामान्य रूग्णालयाच्या कामाला मंजुरी देण्याची घोषणा त्यांनी यावेळी केली.

लातूर येथे दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळा अनावरणानिमित्त दयानंद महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित मुख्य कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री शिवेंद्रसिंह भोसले, पर्यावरण व वातावरणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, राज्य कृषिमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आमदार सर्वश्री विक्रम काळे, संभाजी पाटील-निलंगेकर, धनंजय मुंडे, संजय बनसोडे, अभिमन्यू पवार, रमेश कराड, संजय केणेकर, माजी राज्यमंत्री बसवराज पाटील, माजी आमदार शिवाजी पाटील कव्हेकर, माजी

▶▶ उर्वरित पान २ वर



# ग्रंथालयीन सेवासुविधांच्या उन्नतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

## (राष्ट्रीय ग्रंथपाल दिन विशेष १२ ऑगस्ट २०२५)

जीवनाच्या विकासाचा मुख्य आधार शिक्षण आहे आणि त्या शिक्षणाचा मुख्य पाया ग्रंथालये आहेत, विकसित ग्रंथालये शिक्षणाला बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. जगभरात ग्रंथालये चांगली विकसित झाली आहेत, आता ई-पुस्तके आणि सर्व प्रकारचे ई-साहित्य इंटरनेटद्वारे सर्वत्र सहज उपलब्ध आहे. डिजिटल आणि व्हर्च्युअल ग्रंथालयांची मागणी सतत वाढत आहे. आपल्या देशातील अनेक उच्च शिक्षण संस्था, महागड्या खाजगी शैक्षणिक संस्थांच्या देखील ग्रंथालये चांगल्या प्रकारे विकसित होऊन वाचकांना सर्वोत्तम सेवा देत आहेत. शासन सुद्धा शिक्षण आणि ग्रंथालयांच्या विकासात मदत करत आहे, तरीही लोकसंख्या आणि गरजेनुसार प्रगत ग्रंथालयांच्या बाबतीत आपण खूप मागे आहोत. आजच्या आधुनिक युगात, वाचकांना कमी वेळेत चांगल्या सेवा-सुविधांचा लाभ घेता यावा म्हणून ग्रंथालयांमध्ये तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत संसाधनांचा वापर केला जात आहे. एआय क्रांती नुकतीच सुरू झाली आहे, ज्याचा परिणाम ग्रंथालयांवरही झाला आहे, म्हणजेच ग्रंथालय उन्नतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जात आहे.

देशातील ग्रंथालय शास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाणारे पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन यांची जयंती १२ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय ग्रंथपाल दिन म्हणून साजरी केली जाते. ग्रंथालयांचा चांगला विकास, उत्तम सेवा-सुविधा आणि प्रत्येक वाचकाला पुस्तक आणि प्रत्येक पुस्तकापर्यंत सहज उपलब्धता हे ग्रंथालयाचे निष्पक्ष धोरण आहे. पद्मश्री डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी दिलेले ग्रंथालय शास्त्राचे पाच नियम कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे अधिक चांगल्या प्रकारे पाळले जाऊ शकतात. पुस्तके वापरण्यासाठी आहेत, प्रत्येक वाचकाला त्याचे पुस्तक मिळाले पाहिजे, प्रत्येक पुस्तकाला वाचक मिळाला पाहिजे, वाचकांचा वेळ वाचला पाहिजे आणि ग्रंथालय ही एक विकसित होणारी संस्था आहे. हे नियम ग्रंथालयांच्या सुलभतेचे महत्त्व, वापरकर्त्यांच्या आवश्यकता आणि त्यांच्या विकसनशील स्वरूपावर भर देतात. कृत्रिम बुद्धिमत्ता हे पाच ही नियम उत्कृष्ट रित्या पाळणार.

आजच्या माहिती युगात, प्रत्येक क्षणी डेटाचा ज्ञानरुपी स्फोट होत आहे, ते ज्ञान पात्र वाचकापर्यंत कमी वेळात पोहोचवणे खूप महत्वाचे आहे, त्यामुळे आता तांत्रिक संसाधनांवर अवलंबून राहणे वाढले आहे. एआयचा वापर आता अनेक क्षेत्रांमध्ये खूप प्रभावीपणे केला जात आहे, आर्टिफिशियल इंटेलिजेंस माहिती क्षेत्रात बदल घडवून आणत आहे आणि ग्रंथपालांच्या पारंपारिक कार्याला एक नवीन रूप देत आहे. शैक्षणिक आणि संशोधन ग्रंथालये त्यांच्या सेवा आणि स्पर्धात्मक फायदा सुधारण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करत आहेत, आर्टिफिशियल इंटेलिजेंस हे याचे मुख्य साधन आहे. वाचकांना प्रगत सेवा पुरविण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा सक्रिय नेता म्हणून स्वीकार करावा लागेल. हे प्रगत तंत्रज्ञान नक्कीच ग्रंथपालांसाठी नवीन मार्ग उघडेल आणि हे नवीन नाविन्यपूर्ण पदे आणि भूमिका हाताळण्यास, सध्याच्या आव्हानांचे निराकरण करण्यास आणि त्यांना अप्रचलित होण्यापासून वाचवण्यास मदत करेल. कृत्रिम बुद्धिमत्ता साधने वाचकांना संबंधित पुस्तके, लेख आणि इतर साहित्य सामग्री जलद शोधणे सोपे करतात. मशीन लर्निंगसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षमता शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये वैयक्तिकृत शिक्षण अनुभवांचे दरवाजे उघडतात. वापरकर्त्यांच्या वर्तनाचे आणि पसंतींचे विश्लेषण करून, ग्रंथालये वैयक्तिक गरजांनुसार सूचना आणि संसाधने तयार करू शकतात. साहित्याच्या वापराच्या पद्धतींचे विश्लेषण करून आणि विशिष्ट संसाधनांच्या भविष्यातील मागणीचा अंदाज घेऊन एआय संग्रह विकासास अनुकूलित करण्यास मदत करू शकते.

इंडेक्सिंग ऑटोमेशन वाचकांना नवीन सामग्री शोधण्यास, विशिष्ट आणि अचूक साहित्य सामग्री प्रदान करण्यास आणि वेगवेगळ्या विषयांमध्ये नेव्हिगेट करण्यास मदत करेल, जे मॅन्युअल इंडेक्सिंगसह सहज शक्य नाही, यामुळे वाचक आणि कर्मचाऱ्यांचा वेळ वाचेल. एकाच विषयावरील कागदपत्रे जुळवणे किंवा समान विषय, उपाय किंवा घटनेचे वर्णन करणारे विभाग जोडणे सहज शक्य आहे. आपण विषयाशी संदर्भानुसार संबंधित हजारो कागदपत्रांच्या सामग्रीची तुलना करू शकतो. एआय जगभरात इंटरनेट वर उपलब्ध असलेल्या साहित्यातून विषयानुसार कागदपत्रे शोधते, त्यांचा अभ्यास करते आणि वाचकांना जलद डेटा प्रदान करते. संशोधन पत्रांच्या वास्तविक मजकुरावर आधारित एआय अल्गोरिदम वास्तविक संशोधनाच्या चांगल्या मॅपिंग सिस्टम तयार करतील, जे संशोधकांसाठी उपयुक्त ठरतील. एआयच्या मदतीने कोणत्याही पुस्तकाचा किंवा लेखाचा सारांश देणे ही एक अतिशय सोपी प्रक्रिया आहे, हे मोठमोठा डेटा देखील लहान परिच्छेदांमध्ये उपलब्ध करून देते.

इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीमधून एआय फिल्टर करते आणि गरजेनुसार माहिती सादर करते. ग्रंथालयांनी सर्व वाचकांसाठी एआय-संचालित सेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला पाहिजे, ग्रंथालयांनी ग्रंथालयाच्या मूल्यांनुसार उपाय विकसित आणि अंमलात आणण्यासाठी ग्रंथपाल, तंत्रज्ञ आणि इतर भागधारकांमध्ये सहकार्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता स्वीकारताना, ग्रंथालयांनी त्यांच्या सेवांचा मानवी पैलू राखण्याचा आणि वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जरी एआय ग्रंथालयांना अनेक फायदे देत असले तरी, ते सुरक्षित आहे याची खात्री करण्यासाठी संभाव्य धोके आणि आव्हाने हाताळणे महत्वाचे आहे. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा मानवी विकासावर खूप जलद गतीने परिणाम होईल असे गृहीत धरून आपण त्याचा सुज्ञपणे वापर करू. ग्रंथालयाला प्रगत बनवण्यात एआयचे योगदान अमूल्य ठरू शकते, आपल्याला फक्त त्याच्या वापरात कुशल, सावध आणि जागरूक राहण्याची आवश्यकता आहे.

– डॉ. प्रीतम भी. गेडाम

◆ पान १ वरून पुढे...

### नारायणगड व...

आहे. काल खा. बजरंग बप्पा सोनवणे व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांनी महंत शिवाजी महाराज त्यांची सदिच्छा भेट घेऊन वस्तीगृहाची पाहणी केली. यावेळी बोलताना खा. बजरंग सोनवणे म्हणाले की, श्री क्षेत्र नारायण गड संस्थानच्या माध्यमातून शेतकरी, शेतमजूर, कामगार, गोरगरीब सामान्यांच्या हितासाठी उपक्रम चालू आहेत व भविष्यात ही नवीन उपक्रम सुरू करावेत. महंत शिवाजी महाराज यांचे कार्य लोकाभिमुख आहे. त्यांच्या कृपा आशीर्वादाने होणाऱ्या सामाजहित कार्यास आपला तन-मन-धनाने पाठिंबा असेल. असे आश्वासीत केले आहे. लोकसभा निवडणुकीत सामान्य जनांबरोबर साधुसंत महंत महाराजांचे सहकार्य व आशीर्वाद मला लाभले. विजया नंतर साधू संतांच्या चरणी लीन होण्याचा मानस व्यक्त केला होता. या अनुषंगाने आज महंतासी चर्चा केली. लवकरच बीड जिल्ह्यात महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य संत संमेलन आयोजित करणार असल्याची माहिती खासदार बजरंग सोनवणे यांनी दिली आहे.

### गोसावींच्या वरदहस्ताने....

आहे. पत्यांचे क्लब ,मटका, हातभट्टी, दारू, केमिकल युक्त ताडी यासारखे अवैध धंद्यांमधून मिळणारी कमाई कमी आहे म्हणून की काय पण गोवंश हत्येकडे देखील दुर्लक्ष केले जात आहे. याचाच परिणाम म्हणून नेकनूर गोमांस विक्रीच केंद्र बनलं आहे. गोवंश हत्या बंदी विधेयकाचे तीन तेरा वाजवले जात आहेत. या ठिकाणावरून बीडमध्ये मोठ्या प्रमाणावर गोमांस तस्करी ऑर्डर प्रमाणे केली जात आहे. बीडच्या पेठ बीड पोलीस ठाण्यात २७ जुलै २०२५ रोजी गोमांस विक्री करणाऱ्या दोघांना बार्शी नाका भागात पकडल्याची घटनेची नोंद करण्यात आली होती. अरबाज जलाल खान पठाण वय वर्ष २६, दर्गा कॉलनी नेकनुर याला पकडले देखील.यावेळी पोलिसांनी गोमांस सुद्धा जप्त केले होते. असं असतानाही पेठ बीड पोलिस ठाण्याचे प्रमुख मूदीराज यांना प्रकरणाच्या मुळाशी जाण्याची आवश्यकता वाटली नाही. थोडाफार पैसा घेऊन तात्काळ जामीनही देण्यात आल्याने त्यांच्या देखील प्रामाणिकतेवर जनतेकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. राज्यभरात कुरेशी समाजाने बहिष्कार टाकल्याने जनावरांचा बाजार ठप्प झालेला असला तरी गोवंशाच्या हत्या करणाऱ्यांना मात्र सुगीचे दिवस आल्याच पाहायला मिळत आहे. अशा घटना उघडकीस येऊनही नेकनूर पोलिसांकडून कारवाई होत नसल्याने जनतेतून संतप्त भावना व्यक्त केल्या जात आहेत. पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणात लक्ष घालून गोवंश हत्या करणारा विरोधात कारवाई करावी. तसेच त्यांना आश्रय देणाऱ्या ठाणे प्रमुखावर देखील कारवाई करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### भरधाव ट्रकच्या...

प्रकार नागपूर-जबलपूर राष्ट्रीय महामार्गावर घडला आहे. ग्यारसी अमित यादव असं मृतक महिलेचं नाव असून अमित यादव असं पतीचं नाव आहे, देवलापार पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मोरफाटा परिसरात दुपारी साडे तीन वाजताच्या सुमारास मागून वेगात आलेल्या ट्रकमुळे पत्नी पडून ट्रकच्या चाकाखाली आली. यात पत्नीचा मृत्यू झाला. भरधाव ट्रकच्या धडकेत पत्नीचा मृत्यू झाल्यानंतर हतबल अमित यांनी काय करावं हे सुचत नव्हतं. त्यांनी अनेक वाहनांना हात जोडून थांबवण्याची विनंती केली. पण कोणीही थांबण्यास तयार नव्हतं. एकाही चालकाने माणुसकी दाखवली नाही. अमित यादव डोळ्यातील अश्रू पुसत हात जोडून वाहनांना थांबविण्याचा प्रयत्न करत होते, पण कोणीही वाहन थांबवायाला तयार नव्हत. यावेळी हतबल झालेल्या अमित यादव यांनी शेवटी पत्नीचा मृतदेह स्वतःच्या दुचाकीला बांधला आणि घरी मध्यप्रदेशला घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. पती पत्नी हे मध्यप्रदेशच्या सिवनी येथील रहिवासी आहेत. मागील १० वर्षापासून अमित भुरा यादव (३५) याच्यासोबत कोराडी नजीकच्या लोणारा येथे ते वास्तव्यास होते. रक्षाबंधन असल्याने अमित मोटारसायकलने लोणारा येथून देवलापारमार्गे करणपूरला जात होते. सुरुवातीला मदतीची याचना करताना कोणीही मदतीसाठी वाहन थांबवलं नाही, मात्र मृतदेह घेऊन जाताना पाहिल्यानंतर अनेकांनी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला. यानंतर भीतीपोटी ते थांबायला तयार नव्हते. अखेर महामार्ग पोलिसांनी त्याला अडवून ग्यारसीचा मृतदेह ताब्यात घेत उत्तरीय तपासणीसाठी नागपुरातील मेयो हॉस्पिटलमध्ये पाठविला आहे.

◆ पान १ वरून पुढे...

### तरुणी तृतीयपंथीयाच्या...

मुळची हैद्राबाद येथील रहिवासी असल्याची माहिती आहे. ती मुंबईत घरगुती साफसफाईच्या कामावर होती. पीडितेनं दाखल केलेल्या तक्रारीनुसार, ती मुंबईहून हैद्राबादला जाण्यासाठी रेल्वेने निघाली होती. भूक लागल्याने ती परळीत उतरून एका हॉटेलमध्ये जेवत असताना तृतीयपंथी पूजा गुट्टे हिची नजर तिच्यावर पडली. पुजाने तिच्याकडून तिचीच माहिती काढून घेत तिची गरज जाणून घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी तृतीय पंथीयानं तिला काम देण्याची भुलथाप दिली. त्यानंतर पूजाने सतीश अण्णासाहेब मुंडे (रा. डाबी, ता. परळी) आणि मोहसीन सरदार पठाण (रा. शिवाजीनगर, परळी) या दोघा साथीदारांना बोलावून घेतले. त्यानंतर ते तिघे पिडीतेला मोटारसायकलवर बसवून अस्वलआंबा येथील भागवत अंगद कांदे या चौथ्या साथीदाराकडे घेऊन गेले. तिथे एका मंदिराशेजारी असलेल्या भागवत कांदे याच्या मालकीच्या खोलीमध्ये घेऊन गेले. नंतर जीवे मारण्याची धमकी देत तिला मारहाण केली. नंतर तिघांनी तिच्यावर आळीपाळीने जबरदस्ती करत बलात्कार केला. दरम्यान, गावात सुरु असलेल्या या घृणास्पद प्रकाराची माहिती एका सजग नागरिकाने शनिवारी पहाटे डायल ११२ वर कॉल करून पोलिसांना दिली. या माहितीची गांभीर्याने दखल घेत परळी ग्रामीण ठाण्याचे सहा. फौजदार टोले यांनी अस्वलआंबा गाठले आणि पिडीतेची सुटका केली. यावेळी पोलिसांना पाहताच पूजाने घटनास्थळाहून पळ काढला. मात्र सतीश मुंडे, मोहसीन पठाण आणि भागवत कांदे यांना बेड्या ठोकण्यात पोलिसांना यश आले. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

### यवतमाळ हादरले! ...

याचाच त्रास होत असल्याने तिने त्याच्या आईला हा प्रकार सांगितला. त्यानंतर आईने लगेचच पोलिसांत धाव घेत तक्रार दाखल केली. मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून बाभुळगाव पोलिसांनी अल्पवयीन मुलगा आणि मुली विरुद्ध पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही अल्पवयीन बालकांना बाल निरीक्षणगृहात ठेवण्यात आले आहे,

### दिवंगत गोपीनाथराव...

आमदार गोविंद केंद्रे, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे, पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, महापालिका आयुक्त श्रीमती मानसी यांची उपस्थिती होती.लोकनेते दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्याची संधी मिळाली, हे आपले भाग्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, माजी मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख व दिवंगत गोपीनाथरावराव मुंडे यांची मैत्री सर्वश्रुत होती. आज जिल्हा परिषदेच्या आवारात दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांच्या पुतळ्याचे अनावरण झाले आहे. दिवंगत विलासराव देशमुख यांचाही पुतळा जिल्हा परिषदेच्या आवारात आहे. या दोन्ही मित्रांची स्मारके एकाच आवारात आहेत, हा अनोखा योगायोग असल्याचे मुख्यमंत्र्यांनी नमूद केले. विरोधी पक्षनेता कसा असावा, याचे उत्तम उदाहरण म्हणजे दिवंगत गोपीनाथराव मुंडे. राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. गृह खाते त्यांनी सांभाळले, त्यांच्या काळात मकोका कायदा आणला गेला. गुन्हेगारी दहशतीतून महाराष्ट्राला बाहेर काढण्याचे काम त्यांनी केले, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. बिकट परिस्थितीतही आपल्या विचारांवर ठाम राहण्याची शिकवण दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांनी दिल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तारासाठी त्यांनी आंदोलने केली. सर्व समाजासाठी दिवंगत गोपीनाथराव मुंडे हे हक्काचे घर होते. त्यांची शिकवण अंगिकारली पाहिजे. केंद्रात त्यांना अल्पकाळ केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. या अल्पकाळातही त्यांनी आपल्या कार्याची चुणूक दाखविली. त्यांना मोठा कार्यकाळ मिळाला असता तर वेगळे चित्र दिसले असते. असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. लातूर येथील रेल्वे बोगी निर्मिती कारखाना लवकरच सुरु होत असून यामुळे आगमी काळात १० हजार जणांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. यामध्ये स्थानिकांना प्राधान्य देण्याचे निर्देश दिल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, या कारखान्याला लागणारे कुशल मनुष्यबळ जिल्ह्यातच तयार करण्यासाठी प्रयत्न केले जातील. येत्या पाच वर्षात राज्यातील सर्व शेतरस्ते पक्के करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. समाजातील शेवटच्या व्यक्तीला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

◆ पान ४ वरून पुढे...

### दिल्लीतील निवडणूक...

अधिवेशनाचा १६ वा दिवस असून लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू होताच विरोधी खासदारांनी गोंधळ सुरू केला. खासदारांनी 'वुई वॉन्ट जस्टिस'च्या घोषणा देत सभागृहाच्या वेलमध्ये पोहोचले. यानंतर सभापती ओम बिर्ला यांनी लोकसभा दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब केली. लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरू झाले. लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास सुरू असताना विरोधकांनी 'आम्हाला न्याय हवा आहे' अशा घोषणा दिल्या. यावेळी माध्यमांशी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, इंडिया आघाडीचा मोर्चा निवडणूक आयोगावर आहे. मात्र, याआधी पोलीस बळाचा वापर करण्यात येत आहे. निवडणूक आयोगाला राहूल गांधींवर बोलण्याचा आधिकारी नसून कायदा हा निवडणूक आयोगाच्या घरचा नाही. त्यांनी भाजपसाठी काम करणे सोडावे. निवडणूक आयोग भाजपची बी टिम असल्याचा उल्लेखही खा.सोनवणे यांनी केला.

### दिव्यांग बांधवांना....

कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, नायब तहसिलदार संजय सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, जयभवानी कारखान्याचे माजी व्हा. चेअरमन जगन्नाथ शिंदे, माजी सभापती कुमारराव ढाकणे यांसह आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात विठ्ठल पिराजी पर्हाड, दत्ता किसनराव येवले, रेणुका दत्ता काळे, अभिमान तात्यासाहेब डोंगरे, संजिवणी परमेश्वर डोंगरे, कचरु पोमा पवार, भागवत ज्ञानेश्वर सोळुंके, भानुदास संताराम खरात, चंद्रकलाबाई ज्ञानोबा घवाडे, नंदकिशोर सुदाम सिरसट, गोरख श्रीकृष्ण उबाळे, श्रीकृष्ण आश्रुबा येवले, विजय दत्तात्रय भोजगुडे, कैलास बाबुराव तौर, बाबासाहेब बाजीराव कोकाटे, भिमराव बळीराम कदम, भागवत अर्जुन मेघारे, गोपीनाथ दिलीप कदम, बंडु पुंडलिकराव मोरे, सालेबीन आबेद चाऊस, शेख मोहसिन शेख मतीन, हबीब राजमहंमद शेख, शेख रब्बानीबी हबीब, ऋषिकेश मुंजाबा गाडे, कोंडिराम जगन्नाथ गाडे, गणेश गुलाब गाडे, दत्ता लक्ष्मण गाडे, शफीक बाबु शेख, उद्धव मोहनराव जोगदंड, नारायण भिमराव मोघे, मयुर रामेश्वर कचरे, आशेक वामनराव खंडागळे, रख्माजी दगडु मांगडे, सोपान भिमराव आरबड, अक्षय बाबासाहेब रासणे आदी लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मंजुरी आदेशाचे वाटप करण्यात आले. या वेळी दिव्यांगांच्या वतीने गोरख उबाळे यांनी आपले मनोगत व्यक्त करून आ. विजयसिंह पंडित आणि माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे आभार व्यक्त केले. यावेळी बोलतांना अमरसिंह पंडित म्हणाले की, येणार्या काळामध्ये गेवराई विधानसभा मतदारसंघातील एकही दिव्यांग बांधव रास्त योजनेच्या लाभापासुन वंचित राहणार नाही याची काळजी घेऊ. दिव्यांग बांधवांसाठी गेवराई कार्यालयात वेगळा कक्ष सुरू करण्यात आला असून दर सोमवारी पात्र लाभार्थ्यांनी त्यांची कागदपत्रे या कार्यालयात जमा करावीत. दिव्यांग बांधवांना सन्मानपूर्वक ही सेवा देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त करतांना या लाभार्थ्यांना शासकीय योजनांचे लाभ देतांना कोणी पैशासाठी अडवणूक केली तर थेट मला फोन करण्याचे आवाहन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. दिव्यांग बांधवांसाठी महायुती सरकारने घेतलेल्या निर्णयाचे त्यांनी स्वागत करून उपमुख्यमंत्री ना अजित दादा पवार यांचे आभार मानले. प्रास्तविक करतांना नायब तहसीलदार संजय सोनवणे यांनी शासकीय योजनांची माहिती देऊन संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व प्रक्रिया बाबत सखोल माहिती दिली. उपस्थित दिव्यांग बांधवांनी यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित यांचे आभार मानले. यावेळी हनुमान कोकणे, सरपंच राधाकिसन चक्कर, परमेश्वर धायगुडे,

◆ पान ४ वरून पुढे...

विष्णूपंत घोंगडे, धोंडिराम डिंगरे, रवि निवारे, विष्णू हात्ते, काशिनाथ सपकाळ, अज्जु सौदागर, बळीराम शिंदे, दत्ता घवाडे, अशोक चव्हाण, उद्धव चव्हाण, तौफीक पठाण, अंकुश गायकवाड, रामदास मुंडे, मंगेश कांबळे, राजु पठाण, श्रीचंद सिरसट, गहिणीनाथ उगलमुगले, कृष्णा राऊत, लिंबाजी खोटे, शेख सुभान, प्रहारचे शेख राजु, सुखदेव माने, नजीर कुरेशी, बंडु डोंगरे, महेश ढेरे, आनंद सरपते, शिवाजी डोंगरे, प्रकाश भोले, सोमनाथ गिरगे, मुक्ताराम आव्हाड आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बाजीराव पाटील...

यांनी आपल्या मनोगतातून रक्षाबंधन व क्रांती दिनाचे महत्व सांगितले तसेच जामकर सर यांनी विद्यार्थ्यांना रक्षाबंधनाची माहिती दिली यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भांगे सर यांनी रक्षाबंधना निमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य खाडे सर यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून मूला मुलींना राखी पोर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या या प्रसंगी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सहशिक्षक, मिसाळ सर,मोरे सर,जायभाये सर,जामकर सर,कराड सर,पठाण सर,खेडकर सर,सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार जायभाये सरांनी मानले.

### 10 मोतीबिंदू....

डॉ.दिलीप गायकवाड, डॉ. विमला ईदगार,डॉ. रविंद्र गालफाडे, डॉ. मैथिली कुलकर्णी,डॉ.सुमित कुलकर्णी, डॉ.नारायण आळणे, यांच्या उपस्थितीत या मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास प्रारंभ झाला. रविवारी सकाळी १० मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. पुढील पाच दिवस या शस्त्रक्रिया सुरूच राहणार असल्याचे संयोजकांनी सांगितले आहे.

### आ.सुरेश धस...

यावेळी आ. सुरेश धस यांनी भगवान रामेश्वराकडे केली. यावेळी जि.प.सदस्य माऊली जरांगे,माजी नगराध्यक्ष विकास राळेभात, सभापती किरण शिंदे, सरपंच बाळू घुले,सुखदेव सानप,प्रदीप जाधव,शाहूराव टेकाळे,ऋषीकेश सानप, ऋषिकेश शेंम्बडे, काळू शिंदे,बाबासाहेब पुलावळे,बाळू काका शिंदे,भाऊसाहेब शिंदे, अनिल टेकाळे,आश्रू शेळके,अशोक सानप, गणेश सानप,संग्राम सानप,रामहरी सानप, रमेश भोरे,भरत शिंदे,अमोल शिंदे,दत्ता टेकाळे आदी सह प्रमुख मान्यवर,भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिक्षणाचा उपयोग...

प्रमुख अतिथी इंजि. राजेंद्र घोडके वरिष्ठ अरेखक, सां.भा. विभाग लातूर,भोसले डी.जी. ग्राम विकास अधिकारी शिवणी, यांचा संस्थेतर्फे सत्कार करून संस्थेच्या प्रगती करीत करीत असलेल्या भरगोष सहाय्याबद्दल आभार मानण्यात आले. तसेच मनीषा अविनाश गंडले पदोन्नती, (सहाय्यक संचालक अभियोग संचालनालय महाराष्ट्र), कु सोनिया अविनाश गंडले ( नवनियुक्त प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी व दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ) तसेच प्रा.सुशीलकुमार सांगवीकर केएसके कॉलेज बीड, प्रिया प्रकाश खंदारे, यांची विद्युत सहाय्यक पदी निवड झाल्याबद्दल संस्थेतर्फे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सत्कारास उत्तर देताना प्रत्येकाने आपल्या आई-वडिलांनी शिक्षणाकरता घेतलेल्या कष्टाचे ऋण व्यक्त केले व पालकांनी दाखवलेल्या विश्वासाला तडा न जाऊ देता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितलेल्या समाजऋण फेडण्याच्या बहुमोल उपदेशानुसार

◆ पान ४ वरून पुढे...

सतत प्रयत्नशील राहण्याचे ठोस आश्वासन दिले. स्पर्धेत यश मिळवण्याकरता जिद्द,अभ्यासातील सातत्य, बाबासाहेबांनी घेतलेल्या कष्टाची जाण सतत डोळ्यासमोर ठेवली तर यश नक्की मिळते असे स्पष्ट केले. पूज्य भिक्खु धम्मशील थेरो आपल्या श्रवणीय धम्मदेशनेत पुढे म्हणाले की मानव जीवन हे दुर्मिळ आहे, जो जो मानव तथागतांच्या मार्गाने जाऊन आपले जीवन जगेल त्याच्या जीवनात सुख प्राप्त होते व तो दुःख मुक्त होतो, हे महाभयंकर डाकू अंगुलीमालाच्या जीवनात तथागताच्या उपदेशाने कसा बदल झाला व अनेकांची हत्या करण्यासारख्या महाभयंकर कृत्यापासून तो दूर झाला व जीवनात अरहंत पदापर्यंत कसा पोहोचला ते अनेक उदाहरणाद्वारे स्पष्ट करून सांगितले. पूज्य भंतेंनी स्पष्ट केले की तथागतांचे अत्त दीप भव हे समजावून घेऊन आपली प्रगती ही आपल्याच हातात असते,ती प्रगती कशी करावयाची हे महापुरुषांच्या जीवनगाथा सतत डोळ्यासमोर ठेवून वेळेचे नियोजन करणे व माता रमाई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीमाई, रामजी बाबा सर्व महापुरुषांच्या कष्टाची सतत आठवण ठेवून आपल्या जीवनाची वाटचाल ठेवून त्रिसरण,पंचशील,आर्य अष्टांगिकमार्ग, दहा पारमिता समजावून घेऊन कशी आपली जीवनचर्या ठेवणे हा दुःखमुक्तीचा मार्ग कसा आहे हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. गृहस्ती जीवनात पती-पत्नी संसाररुपी रथाचे दोन चाके आहेत. परस्परावरील विश्वास व एकमेकाला समजावून घेऊन संसार केल्यास आपल्या पाल्यावर सुसंस्कार होतात व ते सुसंस्काराच्या जोरावर या मायावी जगात न भटकता स्पर्धेत यश मिळवून स्व : उधाराबरोबरच समाजसेवा करण्यास कसे प्रवृत्त होतात हे आज सत्कार केलेल्या सर्वांच्या जीवनाकडे बघून समजावून सांगितले. जीवनात धम्माचे महत्त्व किती आहे हे स्पष्ट करताना कर्ता पुरुष जर धम्मचारी असेल तर पत्नी धम्मचारीच होते. पिता असावा तर रामजी बाबा सारखा व पत्नी असावी तर माता रमाई सारखी ज्यांनी आपल्या पाल्या करता उपासलेले अपार कष्ट जिने आपले पत्ती भीमरावा करता ( ज्यांना त्या साहेब बोलत होत्या ) त्यांच्या उच्च शिक्षणाच्या आड न येता संसारात अपार कष्ट केले. गंगाधर, रमेश, इंदू व राजरत्न असे चार लेकरांचा वेळेवर पैसा व औषध उपचार अभावी मृत पावली. त्यांच्या या असीम त्यागातून हे आजचे वैभव आपणा सर्वस प्राप्त झाले. हे प्रत्येकाने लक्षात ठेवावे. व बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दाखवलेल्या मार्गाने जीवन जगणे व जगाला युद्ध नको बुद्ध हवा हे लक्षात ठेवून व्यक्ती स्वातंत्र्य, समता,बंधुता व न्याय याची कास धरून जीवन जगणे सर्वांच्या हिताचे आहे हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. धम्म हॉल येथे टाचणी पडली तरी आवाज येईल अशी एवढी शांतता होती प्रत्येक जण तल्लीन होऊन एक चित्ताने धम्मदेशनीचा लाभ घेत होते. कुसुम शंकरराव गायकवाड यांच्यातर्फे भोजनदान, धम्मदिना महिला मंडळ ताडसोणा यांच्याकडून खीर दान करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन परमेश्वर बनकर त्यांनी केले तर आभार प्रदर्शन भास्कर सरपते यांनी केले.शेवटी पूज्य भिक्खु धम्मशील थेरो यांनी दिलेल्या आशीर्वाद गाथेने कार्यक्रमाची सांगता झाली.

### रेणुकामाता संस्थानातील...

शिवमहापुराण कथेची भव्यता अगदी सुक्ष्मपणे भाविकांच्या मनावर बिंबली आहे. याप्रसंगी सिंथ वादक ह.भ.प.माऊली महाराज घुमरे, तर तबला बादक ह.भ.प. जगन्नाथ महाराज कराळे यांची व इतर सहकारी यांचीही त्यांना चांगली साथ मिळाली. दरम्यान शिवमहापुराण भगवान शंकर आणि त्यांच्या अवताराशी निगडीत आहे. त्यात शिवभक्ती, शिव महिमा आणि शिवाचे संपूर्ण जीवन चरित्र वर्णिले आहे. त्याचबरोबर ज्ञान, मोक्ष, उपास, तप, जप यांचा मिळणाऱ्या फळांचे देखील वर्णन आढळतं. सहस्त्र शिवमहापुराणामध्ये ज्ञानवर्धक आणि भक्ती विषयक लिहिले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

यात प्रामुख्याने घन संग्रह, रागाचा त्याग, अन्नाचा त्याग, संध्याकाळ, खरं बोलणे, निष्काम कर्म, अनावश्यक इच्छांचा त्याग

करणं, मोहाचा त्याग करणं, सकारात्मक कल्पनाशक्ती, प्राणी नव्हे तर माणूस बना यांविषयी सविस्तर असे वर्णन ह.भ.प. शालीग्राम महाराज मते लोणीकर यांनी या सात दिवसीय संपूर्ण शिवमहापुराण कथेत केले. यावेळी याच्या सांगतेप्रसंगी बोलतांना श्री. रेणुकामाता संस्थानाचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रमुख अण्णा महाराज दुटाळ हे अतिशय भावूक झाले होते. ते म्हणाले की, या शिवमहापुराण कथेच्या समार रोपाच्या क्षणाला आज आषण आलो आहोत. याचे एका डोळ्यात आनंद आहे तर दुसऱ्या डोळ्यात दुःख आहे. की उद्या पासून या कथेचे श्रवण आपणांस होणार नाही. या कल्पनेनेच संपूर्ण उर भरून आले आहे. भगवान शिव महादेवाची सेवा, कृपा, लिला, आशिर्वाद काय आहे हे यातून अगदी जवळून अनुभवता आले. अगदी सुरुवातीपासून ते सांगतेपर्यंत आपण सर्वांनी दिलेला भरभरुन प्रतिसाद मनाला समाधान देणार आहे. हा प्रतिसाद पाहूनच आम्हाला एक नवी ऊर्जा मिळाली असून या अनुषंगाने पुढील वर्षीही श्रावण महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी आपण याठिकाणी या शिवमहा-पुराण कथेचं आयोजन करणार असून गेल्यावर्षीप्रमाणेच यावर्षीच्या शिवमहापुराण कथेच्या सोहळ्यालाही असंख्य जणांचे हातभार लागले असून काहीच कमी पडले नाही. त्यांच्या सहकार्यामुळेच हा कार्यक्रम भव्य दिव्य असाच झाला आहे. व यापुढेही असेच सहकार्य लाभत राहील असे बोलत अण्णा महाराज दुटाळ यांनी सर्वांचे आभार मानले. दरम्यान समस्त वडवणीकरांसाठी हा शिवमहापुराण कथा सोहळा म्हणजे मोठी अध्यात्मिक पर्वणी ठरली असून या कथेची सांगता दि.१० ऑगस्ट २०२५ रविवार रोजी झाली. यावेळी या शिवमहापुराण कथेच्या सांगतेची महाप्रसादाची पंगत देणारे आ चारी महादेव राऊत व परमेश्वर राठोड यांचाही संयोजकांच्या वतीने आभार सत्कार करण्यात आला. तसेच याप्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांचाही आभार सत्कार करण्यात आला. आणि मुख्य म्हणजे आपल्या लेखणीच्या माध्यमातून या अध्यात्मिक कार्याला अधिकतेने उजाळा देणारे बडवणी तालुक्यातील सर्व पत्रकार बांधचांचाही संयोजकांनी आभार सत्कार करून त्यांचे आभार मानले. सांगतेच्या या कार्यक्रमाला वडवणीसह पंचक्रोशीतील सर्व शिवभक्त, असंख्य मान्यवर, राजकीय, सामाजिक, अध्यात्मिक, क्षेत्रातील पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार, डॉक्टर्स, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या शिवमहापुराण कयेच्या श्रवणासाठी सात दिवस रेणुकामाता संस्थानाचा परिसर गर्दीन तुडूंब भरला होता. याप्रसंगी वडवणीसह पंचक्रोशीतील शिवभक्त व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची उपस्थिती तर लक्षणीय होती. शेवटी सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

### माऊली ज्ञानोबारायांच्या...

प्रसार व्हावा या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला असल्याचे पत्रकात डाके महाराजांनी म्हटले आहे. ज्या लोकांना ज्ञानेश्वरी जाणून वा समजून घेण्याचे कुतूहल आहे. अशा भाविक लोकांच्या घरात ज्ञानेश्वरी पोहोचती करून ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून माऊली ज्ञानोबारायांचे विचार घरोघरी पोहोचवण्याचा संकल्प हरिभक्त परायण माधव महाराज डाके यांनी केला असून, पन्नास श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट देण्याचा उपक्रम त्यांनी या माऊलींच्या सातशे पन्नासाव्या जन्म शताब्दी वर्षा निमित्त हाती घेतला आहे. लवकरच अशा गरजू तथा इच्छुक भाविक भक्तांच्या घरी स्वतः जाऊन ज्ञानेश्वरीचा पहिला अध्याय वाचून, भाविकांच्या हातात ज्ञानेश्वरी ग्रंथ भेट देण्याचा संकल्प ह.भ.प. माधव महाराज डाके यांनी केला आहे. या उपक्रमात सहभागी होऊन याचा लाभ गरजू तथा भाविक ज्ञानेश्वरी वाचकांनी घ्यावा असे आवाहन माधव महाराज डाके यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# परळीतील 'वैद्यनाथ बँकेसाठी मतदान; आज निकाल ,पंकजा मुंडे पुन्हा वरचष्मा राखतील ?

**बीड । प्रतिनिधी**

परळी येथे मुख्यालय असलेल्या वैद्यनाथ अर्बन को ऑपरेटिव्ह बँकेच्या १७ संचालक मंडळाच्या जागांसाठी रविवारी १०८ केंद्रावर मतदान पार पडले. पशुसंवर्धनमंत्री पंकजा मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे, प्रज्ञाताई गोपीनाथराव मुंडे यांच्यासह आम दार धनंजय मुंडे आदींनी मतदानात सहभाग घेतला. १२ ऑगस्ट रोजी निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

बँकेच्या १७ पैकी चार जागा



बिनविरोध आल्याने उर्वरित १३ जागांसाठी मतदान झाले असून बँकेचे ४३ हजार ९६२ हजार सदस्य मतदार आहेत. बीड जिल्ह्यात ६७ मतदान केंद्र आहेत. लातूर, धाराशिव, परभणी, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, जालना, जळगाव, नाशिक, मुंबई, पिंपरी चिंचवड, सोलापूर जिल्ह्यात हे बूथ आहेत.अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर सर्वसाधारण मतदार संघातून १२ जागांसाठी १४ उमेदवार रिंगणात राहिले आहेत. तर निवडणुकीत महिला मतदार संघातून डॉ. प्रीतम गोपीनाथ मुंडे, माधुरी योगेश मेनकुदळे, ओबीसी मतदार संघातून अनिल तांदळे तर अनुसूचित जाती मतदार संघातून विनोद जगतकर हे बिनविरोध आले आहेत.

समृत जाधव निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या म ार्गदर्शनाखाली निवडणूक प्रक्रिया होत आहे. राज्य निवडणूक प्राधिकरणाने या निवडणुकीसाठी ५०० पेक्षा जास्त कर्मचारी नियुक्त केले आहेत. वैद्यनाथ बँकेच्या निवडणूक मतदानासाठी परळी येथे वैद्यनाथ महाविद्यालयात १९ केंद्र, लक्ष्मीबाई महाविद्यालयात १० तर वैद्यनाथ कारखाना परिसरात ६ असे एकूण ३५ मतदान केंद्र आहेत. मतदानानंतर मतपेटीसाठी बीड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात स्ट्राँगरूम असून १२ ऑगस्ट रोजी मतम ोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे.

दिवंगत भाजप नेते गोपीनाथ मुंडे यांनी त्यांच्या राजकारणाला समाजकारणाचीही जोड देण्यासाठी म्हणून स्थापन केलेली पहिली संस्था म्हणजे वैद्यनाथ अर्बन बँक. परळीचे तत्कालीन नगराध्यक्ष अशोक सामत आदींना सोबत घेऊन बँकेची मुहूर्तमेढ रोवली. पुढे या बँकेची भव्य चार म जली इमारत साधारण ३० वर्षांपूर्वी उभी करून तिचे लोकार्पण तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या हस्ते केले होते. मुंडे तेव्हा राज्यात विरोधी पक्षनेते होते. एकाच हेलिकॉप्टरने नाईक व मुंडे परळीत उतरले होते. पुढे बँकेच्या शाखांचा राज्यभर विस्तार झाला. मुंडे यांच्या निधनानंतर पंकजा मुंडे यांच्याकडेच बँकेची सूत्रे आली.

पंकजा मुंडे व धनंजय मुंडे परस्परांविरोधात असताना बँकही पंकजा मुंडे यांच्या ताब्यातून जाते की काय अशी चर्चा व्हायची. परंतु अद्याप तरी पंकजा मुंडे यांनी बँकेवरची पकड कायम राखली आहे. सध्याच्या निवडणुकीत पंकजा मुंडे व धनंजय मुंडे यांच्यामध्ये सामंजस्य राजकारण सुरू असून, धनंजय मुंडे यांच्या चार समर्थकांना निवडणुकीत संधी देण्यात आली आहे. मुंडे भावंडांचे स्थानिक पातळीवरील विरोधक राजेभाऊ फड यांनी बँकेच्या निवडणुकीत परिवर्तन पॅनल उभे करून काहीसे आव्हान उभे करण्याचा प्रयत्न केला आहे.

## बालरंगभूमी परिषदेतर्फे राबविणार 12 ऑगस्टला 'इतिहास महाराष्ट्राचा

**बीड । प्रतिनिधी**

बालरंगभूमी परिषदेतर्फे 'इतिहास महाराष्ट्राचा' हा उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रभर राबवला जात असून, बीड जिल्ह्यातील कार्यक्रम १२ ऑगस्ट रोजी होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सवापासून ते राज्याभिषेक सोहळ्यापर्यंतचा इतिहास नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला व वक्तृत्व या विविध कलामाध्यमांतून मंचावर सादर केला जाणार आहे. या उपक्रम ांतर्गत मुलांसाठी इतिहासातील घटनांवर आधारित स्पर्धा घेण्यात येणार असून ती तीन गटांत होईल, दोन एकल गट आणि एक समूह गट. गेवराई, माजलगाव, उमरी आणि बीडमधील अनेक शाळा व वर्गातून बालकलावंत सहभागी होणार आहेत. स्पर्धा सौ. के. एस. के. महाविद्यालयाच्या सभागृहात होईल. कार्यक्रमाचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुम ार स्वामी यांच्या हस्ते होईल, तर प्रमुख अतिथी म्हणून नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर उपस्थित राहतील, अशी माहिती बीड बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर यांनी दिली. बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष नीलम शिर्के-सामंत यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दिनांक १२ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता सुरू होणाऱ्या या स्पर्धेत सुमारे ३०० ते ३५० बालकलावंत सहभागी होतील. छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास विविध कलामाध्यमांतून रसिकांसमोर उभा राहणार आहे. स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक मिळवणारे सहा संघ अंतिम फेरीसाठी २३ व २४ ऑगस्ट रोजी मुंबई येथे पाठवले जातील. रसिकांनी या उपक्रमाचा मनसोक्त आनंद घ्यावा, असे आवाहन बीड नाट्य परिषदेच्या अध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर, कार्यवाह डॉ. संजय पाटील देवळाणकर, सहकार्यवाह स्नेहल पाठक, विलास सोनवणे, मिलिंद शिवणीकर, अनिता शिंदे, दुष्यंता रामटेके, अमित गाढे, नाम देव साळुंखे, विजय राख, सिद्धार्थ अग्रवाल, दीपक गिरी, रोहित पुराणिक, असलम शेख, सुरेश साळुंखे, बालासाहेब कांबळे, अनुराधा चिंचोलकर, दीपक जमदाडे, पवन शिंदे व सुरेश थोरात यांनी केले आहे.

## अपघातातील जखमी जनावरांचे प्राण डॉ. तेजस दुनघव यांनी वाचविले!

**● सर्व स्तरातून डॉ दुनघव यांचे होत आहे कौतुक**

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील बसस्थानका समोर शनिवार रोजी रात्री १२:१५ वाजण्याच्या सुमारास जालना रोडवर एका अज्ञात वाहनाने मोकाट जनावरांसह दोन म्हशींच्या पिल्लांना धडक दिली. यात मोकाट जानावरांसह म्हशींची दोन्ही पिल्ले गंभीर जखमी झाल्याची माहिती डॉ. तेजस दुनघव यांना मिळताच दुनघव यांनी तत्काळ जखमी जनावरांवर उपचार केल्याम ुळे जीवदान मिळाले. डॉ दुनघव यांनी कामाम ुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की बीड शहरातील बस स्थानकासमोर नेहमीच म ोकाट जनावरांचा वावर असतो. काही प्रसंगी



हे जनावरे रस्त्यावर ठाण मांडून बसलेले असतात. त्यांच्यामुळे अनेक वेळा अपघात झालेले आहेत.

शनिवार रोजी रात्री १२:१५ वाजण्याच्या सुमारास जालना रोडवर एका चारचाकी वाहन मोकाट जनावरांसह दोन म्हशींच्या पिल्लांना जोरात धडक देऊन ही चारचाकी दुभाजकावर गेली. या अपघातात दोन म्हशीचे पिल्ले गंभीर जखमी अवस्थे मध्ये पडले होते. या घटनेची माहिती मिळताच जनावराचे डॉक्टर तेजस दुनघव यांनी

तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या जनावरांवर उपचार करायला सुरुवात केली. अगदी वेळेत उपचार सुरू झाल्यामुळे गंभीर जखमी जनावरांना वाचवण्यात डॉक्टर दुनघव यांना यश आले. मोकाट गंभीर जखमी झालेल्या या जनावरांवर उपचार करून त्यांना जीवदान देणाऱ्या डॉ. दुनघव यांनी केलेल्या या कामामुळे जनावराचे प्राण वाचले आहेत. त्यामुळे त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## ॲड. सुभाष पिसोरे याची वकील संघाचे अध्यक्षपदी निवड

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा वकील संघाची निवडणूक पार पडली. या निवडणुकीमध्ये अध्यक्षपदी ॲड. सुभाष पिसोरे, उपाध्यक्ष ॲड. रघुराज देशमुख, सचिव ॲड. सुभाष काळे, सहसचिव ॲड. धीरज कांबळे, कोषाध्यक्ष ॲड. योगेश टेकाळे ग्रंथपाल सचिव ॲड. सय्यद अजीम आणि महिला प्रतिनिधी पदी ॲड. मनीषा गडकर कुपकर या विजय झाल्या. दोन पॅनल



मध्ये प्रामुख्याने ही निवडणूक पार पडली. सुभाष पिसोरे यांचे पॅनलचे सर्व उमेदवार यात मोठ्या फरकाने विजयी झाले. जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीमध्ये काम पाहिलेले निवडणूक निर्णय अधिकारी रवींद्र किर्दात, निरीक्षक ॲड. पी. ए. हुंबे, ॲड. सुनंदा जाधव तसेच ॲड. सुधीर जाधव ॲड. उमेश धांडे, ॲड. रमेश राऊत, ॲड. अभिजीत डोंगरे, ॲड. लिंबा लाखे, ॲड. सदानंद वाघमारे ॲड. अजित देशमुख यांनी निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडली.



*बीड जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीमध्ये शिवसंग्राम परिवाराच्या सदस्य महिला आघाडी जिल्हाध्यक्ष अँड मनिषा ताई कुपकर विक्रमी मताने विजयी.*



## जिल्हाध्यक्षपदी सोपान गोरे यांची निवड

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील वाघोरा येथील सामाजिक कार्यकर्ते तथा सावता महासंघाचे जिल्हाध्यक्ष सोपान गोरे यांची जय बजरंग प्रतिष्ठानच्या जिल्हाध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे या निवडीचे पत्र जालना येथे झालेल्या कार्यक्रम ात त्यांना प्रदान करण्यात आले आहे.

सोपान गोरे हे गत अनेक वर्षापासून सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत त्यांनी आतापर्यंत विविध सामाजिक संघटनेच्या पदावर काम केले आहे त्यांच्या या कामाची दखल घेऊन जय बजरंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष रामप्रसाद मुंदडा यांनी सोपान गोरे यांना बीड जिल्हा अध्यक्षपदी नियुक्ती दिली आहे. येणाऱ्या काळात जय बजरंग प्रतिष्ठानचे कार्य जिल्ह्यात युवकापर्यंत पोहोचण्याचे काम करावे अशी अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. जालना येथे दि. १० ऑगस्ट रोजी झालेल्या कार्यक्रमात सोपान गोरे यांना जिल्हाध्यक्ष पदाचे नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले आहे. यावेळी संस्थापक अध्यक्ष रामप्रसाद मुंदडा, सुभाषचंद्र देविदान, अंकुश राऊत, दिगांबर पेरे, मुन्ना गजबी, हिरालाल पिपरिये, पवन जोशी, बबनराव घायाळ, लक्ष्मण नेमाने, निलेश उपाध्याय, सुनील भावसार, संभाजी गोरे, संजय मुंदडा, गोविंद मुंदडा, गोविंद गाजरे सह आदी उपस्थित होते. दरम्यान सोपान गोरे यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## पुण्यात भयानक अपघात! ९ जण जागीच ठार तर ३५ जण जखमी




**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात एक भयानक अपघात झाला आहे. पिकअप जिप १०० फ ूट खोल दरीत कोसळून हा अपघात झाला आहे. या अपघातात ९ जण जागीच ठार झाले आहेत. ३५ जण जखमी झाले असून २३ जणांची प्रकृती गंभीर आहे. सर्व जण खेड तालुक्यातील कुंडेश्वर दर्शनाला जाताना हा भीषण अपघात झाला.

श्रावण महिन्याच्या तिस-या सोमवार निमित्ताने दर्शनासाठी जात असताना भाविकांवर काळाने घातला आहे. सर्व अपघातग्रस्त एकाच गावचे आहेत. पापळवाडी गावचे हे रहिवासी आहेत. पापळवाडी गावातील ४० जण कुंडेश्वर दर्शनाला निघाले. यावेळी खेड येथील पाईट गावाजवळ नागमोडी वळणावर घाट चढताना पिकअप जिप १०० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला आहे. तर २३ जणांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते.

स्थानिक तातडीने अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी धावून आले. यानंतर पोलिस आणि वैद्यकीय बचावर पथक घटनास्थळी दाखल झाले. १० रुग्णवाहिकांतून जखमींना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. पिकअप दरीत पडल्याने बचाव कार्यात अनेक अडथळे येत होते. सर्व जखम ींवरती खेड तालुक्यातील चांडोली ग्रामीण रुग्णालय चाकण ग्रामीण रुग्णालयासह विविध खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हे सर्व भाविक खेड तालुक्यातील पाईट आणि पापळवाडी परिसरातील असून या दुर्दैवी घटनेने परिसरात शोककळा पसरली आहे.

## पाण्याची बचत म्हणजे भविष्यातील समृद्धी

### जलनायक मयंक गांधी यांच्या उपस्थितीत साळेगावातील महिला-पुरुषांनी गिरवले भविष्यातील शाश्वत विकासाचे धडे

**परळी वै. । प्रतिनिधी**

जलनायक मयंक गांधी संस्थापित ग्लोबल विकास या संस्थे अंतर्गत चालणाऱ्या सिरसाळा येथे सोमवारी विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. माजलगाव तालुक्यातील साळेगाव येथील १३९ महिला आणि पुरुषांनी पाण्याची बचत, जलसंधारण, पाणी व्यवस्थापन, शाश्वत उत्पन्न वाढीसाठी आधुनिक शेती, फळबाग लागवड तंत्र आदींचे त्यांनी धडे घेतले. ग्लोबल विकास ट्रस्टकडून या गावाला आगामी काळात सुधारणांच्या दृष्टीने आवश्यक अशी कामे आणि मदत करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने गावातील प्रत्येक नागरिक त्या कामाशी अवगत होऊन एकरूप झाला पाहिजे. सोमवारी झालेल्या कार्यक्रमास जलनायक मयंक गांधी यांचीही उपस्थिती होती. त्यांनी उपस्थित सर्वांना मार्गदर्शन केले. पाण्याची



बचत म्हणजे भविष्यातील समृद्धी या विचारांना अनुसरून साळेगाव गावातील १३९ महिला व पुरुष शेतकऱ्यांनी कृषिकूल, सिरसाळा येथे एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम ात उत्साहाने सहभाग नोंदवला. जलनायक मयंक गांधी यांच्यासह ग्लोबल विकास ट्रस्टच्या प्रशिक्षक टीमकडून जलसंधारण, पाणलोट व्यवस्थापन, जलबचततंत्र, फळबाग लागवड आणि उत्पादनवाढीच्या आधुनिक पद्धती याबाबत त्यांना सखोल मार्गदर्शन मि ळाले. तसेच पाणलोट व्यवस्थापन कक्ष, कृषी यांत्रिकीकरण कक्ष, ग्लोबल विकास ट्रस्ट प्रवास कक्ष, कीटक संगोपन गृह आणि माती प्रयोगशाळा यांची प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीतील नव्या तंत्रज्ञानाची ओळख झाली.

दैनिक **मराठवाडा पत्र**
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. १२ ऑगस्ट २०२५ ● पान ४

# दिल्लीतील निवडणूक आयोगाविरोधातील मोर्चात बीडचे खा.सोनवणे आघाडीवर

## महाराष्ट्रात मतदानाच्या आदल्यादिवशी मतदार यादीत नावे सामाविष्ठ केली: खा.सोनवणे




**बीड । प्रतिनिधी**

मतचोरी प्रकरणी दि.११ ऑगस्ट रोजी इंडिया आघाडीच्या ३०० खासदारांनी संसदेचे मकरद्वार ते निवडणूक आयोग कार्यालयापर्यंत काढलेला मोर्चा दिल्ली पोलीसांनी आडविला. दरम्यान, या खासदारांमध्ये देशाचे नेते शरद पवार, राहूल गांधी, खा.सुप्रिया सुळे यांच्या खांद्याला खांदा लावून बीडचे खा.बजरंग सोनवणे आघाडीवर होते. यावेळी त्यांनी महाराष्ट्रात देखील म तदानाच्या आदल्या दिवशी मतदार यादीत नावे, समाविष्ठ केली जात होती, असा खळबळजनक आरोप केला. इंडिया आघाडीच्या ३०० खासदारांनी संसदेचे मकरद्वार ते निवडणूक आयोग कार्यालयापर्यंत मोर्चा काढण्यास सुरुवात केल्यानंतर दिल्ली पोलिसांनी अडवला. खासदारांनी हातामध्ये 'सेव्ह व्होट'चे बॅनर घेतले होते. तथापि, दिल्ली पोलिसांनी सांगितले होते की इंडिया आघाडीने या मोर्चासाठी कोणतीही परवानगी घेतली नाही. बिहारमधील मतदार यादीतील अनियमिततेच्या आरोपावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली ३०० विरोधी खासदारांनी दिल्लीत पायी मोर्चा काढला आहे. या मोर्चात बीडचे खासदार बजरंग सोनवणे आघाडीवर होते. तर संसदेच्या पावसाळी ▶ उर्वरित पान २ वर

**● लोकशाही टिकवण्यासाठी निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी इंडिया आघाडी एकत्र उभी आहे. ही लढाई लोकशाही वाचविण्यासाठी असून आम्ही ती शेवटपर्यंत लढणार आहोत. – खा.बजरंग सोनवणे, बीड.**

# दिव्यांग बांधवांना लाभ मिळवुन देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणार : अमरसिंह पंडित

## गेवराई येथे दिव्यांग लाभार्थ्यांना सन्मानपूर्वक मंजुरी पत्राचे वाटप



**गेवराई । प्रतिनिधी**

दिव्यांग बांधवांच्या सन्म ानार्थ आणि सक्षमीकरणासाठी उपमुख्यमंत्री ना. अजित पवार आणि महायुती सरकारने मोठा निर्णय करून त्यांच्या अर्थ साहाय्यात १५०० रु हून वाढ करून दरमहा २५०० रु अर्थ सहाय्य देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आपणही गेवराई म तदारसंघातील दिव्यांग बांधवांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन माजी आम दार अमरसिंह पंडित यांनी केले आहे. कृष्णाई येथे आयोजित संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील मंजुरी पत्राचे वाटप कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांच्या शुभहस्ते प्रातिनिधिक स्वरूपात ३५ दिव्यांग लाभार्थ्यांना मंजुरी पत्राचे सन्मानपूर्वक वाटप करण्यात आले.

सोमवार दिनांक ११ ऑगस्ट रोजी गेवराई शहरातील कृष्णाई येथे तालुक्यातील दिव्यांग लाभार्थ्यांना सन्मानपूर्वक संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील मंजुरी पत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर जय भवानी सहकारी साखर ▶ उर्वरित पान २ वर

# बाजीराव पाटील विद्यालयात रक्षाबंधन व क्रांतीदिन उत्साहात संपन्न



**जांब । प्रतिनिधी**

स्फुर्ती शिक्षण प्रसारक मंडळ जांब संचलित बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जांब ता.शिरूर का.येथे रक्षाबंधनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक खाडे टी व्ही तर प्रमुख पाहुणे भांगे सर या प्रसंगी रक्षाबंधनाचे महत्व जायभाये सरांनी प्रस्ताविकातून व्यक्त केले शाळेतील मुलींनी मुलाना राखी बांधून औक्षण केले .विद्यालयाचे सहशिक्षक मोरे सर

▶ उर्वरित पान २ वर

# 10 मोतीबिंदू शस्त्रक्रियांनी शिबिरास प्रारंभ वसुंधरा सेवा प्रतिष्ठान, व रोटरी क्लबचा उपक्रम



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

स्व.डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांच्या जयंती निमित १० ऑगस्ट ते १४ या कालावधीत वसुंधरा सेवा प्रतिष्ठान व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय व लोखंडी सावरगाव येथील रुग्णालयात मोफत भव्य मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराची सुरुवात रविवारी १० जणांच्या शस्त्रक्रिया करून या शिबिरास प्रारंभ झाला. स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय, व लोखंडी सावरगाव येथील रुग्णालयात अशा दोन्ही ठिकाणी मोतीबिंदू मोफत शस्त्रक्रिया होणार आहेत. या शस्त्रक्रिया करण्यासाठी दोन्ही रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची टीम दाखल झाली आहे. रविवारी सकाळी वृद्धत्व व मानसिक आजार केंद्राचे अधीक्षक डॉ.सुनील जाधव,स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ चंद्रकांत चव्हाण, भाजपा चे शहर उपाध्यक्ष कल्याण काळे, रोटरीच्या अध्यक्षा प्रा.रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंकी, सचिव मंजुषा जोशी, प्रा. अजय पाठक, आनंद जाजू, वसुंधरा सेवा प्रतिष्ठानचे महादू मस्के, अनंत अरसुडे, रुग्णालयाचे

▶ उर्वरित पान २ वर




*श्री. सोमेश्वर मंदिर बार्शी रोड बीड या ठिकाणी श्रीमद भागवत कथा ज्ञानयज्ञ् सोहळा सांगता सुरु असतांना आरती करताना भाजपा नेते नवनाथ आण्णा शिराळे, सौं. रूमक्मिणी नवनाथ शिराळे सह परिवार आरती करतांना छायाचित्रात दिसत आहेत.*

# आ.सुरेश धस यांनी केली भगवान रामेश्वराची महापूजा

## सौताडा येथे लाखो भाविकांनी घेतले भगवान रामेश्वराचे दर्शन



**आष्टी । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील सौताडा येथे डोंगरदरीमध्ये असलेल्या भगवान रामेश्वराची तिसऱ्या सोम वारी आष्टी- पाटोदा- शिरूर चे आमदार सुरेश धस यांनी महापूजा केली. ही पूजा येथील पुरोहित पांडुरंग प्रभाकर देशमुख उर्फ पांडू देवा यांनी केली.

बीड जिल्ह्यामध्ये बीड -नगर रोडवर पाटोदा तालुक्यामध्ये सौताडा हे गाव आहे. या ठिकाणी असलेल्या डोंगरदऱ्याच्या कपारीत सुंदर असे भगवान रामेश्वराचे मंदिर आहे. या ठिकाणी मोठा धबधबा असल्याने आणि वनविभागाने हा परिसर विकसित केल्याने अत्यंत सुंदर आणि रमनिय असे हे ठिकाण बनले आहे. या ठिकाणी दर श्रावण सोमवारी यात्रा भरते. श्रावण महिन्यातील तिसरा सोमवार हा विशेष असतो. सोमवारी सकाळी ६ वाजता आष्टी-पाटोदा-शिरुरचे आमदार सुरेश धस, सौताड्याचे सरपंच बाळू घुले, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप काका जाधव यांनी भगवान रामेश्वराची महापूजा केली. या पूजेचे पुरोहित या देवस्थानचे प्रमुख पांडुरंग प्रभाकर देशमुख उर्फ पांडू देवा शास्त्री यांनी केले. यावेळी भाविकांनी दर्शनाला गर्दी केली होती. सोमवारी दिवसभर हा परिसर भाविकांनी फुलून गेला होता. या निसर्गरम्य ठिकाणी एरवी ही पर्यटकांची गर्दी असते. सोम वारी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होते. पोलीस विभागाकडून या ठिकाणी मोठा बंदोबस्त लावला जातो. याशिवाय वनविभागाच्या अधिकारी आणी कर्मचारी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून तैनात असतात. सोमवारी सौताडा येथे भगवान रामेश्वराचे लाखो भाविकांनी दर्शन घेतले.म ागील काळापासून देवस्थान विकास कामापासून वंचित असून पाहिजे तसा विकास झाला नाही तो मी येणाऱ्या काळात भरून काढत देवस्थानसाठी ब दर्जा प्राप्त करून देणार असून यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. येणाऱ्या काळात देवस्थानच्या विकास काम ांना या माध्यमातून गती मिळणार आहे. असून माझा बळीराजा सुखी कर अशी प्रार्थना

▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### शिक्षणाचा उपयोग करून मोक्याच्या जागा मिळवा, त्या पदाचा उपयोग समाजाचे ऋण फेडण्याकरता करा: पूज्य भिक्खु धम्मशील थेरो श्रावण पौर्णिमा धम्मदेशना संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्था बीड महाविहार धम्मभूमी भदंत आनंद कौसल्यन नगर मौजे शिवनी ता जि बीड येथे दर पौर्णिमेला धम्मदेशनेचे आयोजन करून आचरणशील परंपरा निर्मितीसाठी , पौर्णिमेचे महत्त्व जनसामान्यां पर्यंत पोहोचवण्याकरिता बौद्ध संस्कृती जतनच नव्हे तर तिचे संवर्धन करण्याकरिता प्रयत्नशील आहे. श्रावण पौर्णिमे महोत्सवच्या धम्मदेशने प्रसंगी शिक्षणाचा उपयोग करून मोक्याच्या जागा मिळवा त्या पदाचा उपयोग समाजाचे ऋण फ ेडण्याकरता करा असा बहुमोल उपदेश पूज्य भिक्खु धम्मशील थेरो यांनी केला. धम्मदेशना कार्यक्रमास पूज्य भंते बुद्ध बोधी शिवणी यांची उपस्थिती होती. धम्मदेशनेप्रसंगी प्रियदर्शी धम्म संस्कार शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, बहुसंख्य सदस्य उपासक –उपासिकांची उपस्थिती होती. सर्वप्रथम संघाच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पदीप धुपाने पूजन करून त्रिवार वंदन करून भिक्खु संघाकडून उपस्थिततांनी त्रिसरण, पंचशील ग्रहण केले. ▶ उर्वरित पान २ वर

### रेणुकामाता संस्थानातील शिवमहापुराण कथेच्या सांगतेस जनसागर लोटला



**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्य दैवता व शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात बसलेल्या श्री. रेणुकामाता संस्थान या ठिकाणी भव्य शिवमहापुराण कथाचे आयोजन दि.४ ऑगस्ट २०२५ सोमवार रोजीपासून करण्यात आले होते. या कार्यक्रमाची सांगता दि.१० ऑगस्ट २०२५ रविवार रोजी झाली. या शिवमहापुराण कथेच्या श्रवणासाठी सात दिवस गर्दनि तुडुंब भरला होता. याप्रसंगी वडवणीसह पंचक्रो–रेणुकामाता संस्थानाचा परिसर शीतील शिवभक्त व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिलांची उपस्थिती तर लक्षणीय होती. शेवटी सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला. याचाचत अधिक माहिती अशी की, वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्य दैवता च शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या श्री. रेणुकामाता संस्थान याठिकाणी भव्य शिवमहापुराण कथेचे आयोजन दि.४ ऑगस्ट २०२५ सोमबार रोजीपासून दैनंदिन सकाळी ११ ते २ या वेळेत करण्यात आले होते. महाराष्ट्रातील नाम ांकित शिवमहापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प. शालीग्राम महाराज मते लोणीकर यांच्या कर्णमधुर वाणीतून या ▶ उर्वरित पान २ वर

### माऊली ज्ञानोबारायांच्या सातशे पन्नासाव्या जन्म शताब्दी वर्षानिमित्त एकावन्न ज्ञानेश्वरी ग्रंथ मोफत भेट देण्याचा माधव महाराज डाके यांचा उपक्रम




**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक तथा ज्ञानेश्वरी भावकथा प्रवक्ते श्री. ह भ प म ाधव महाराज डाके काठवडेकर यांनी माऊली ज्ञानोबारायांच्या सातशे पन्नासाव्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ५१ ज्ञानेश्वरी ग्रंथ मोफत वाटपाचा उपक्रम हाती घेतला आहे. सविस्तर वृत्त असे की,बीड शहरातील वारकरी सांप्रदायिक कीर्तनकार श्री.ह.भ.प. माधव महाराज डाके यांनी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज अर्थात माऊली ज्ञानोबरायांच्या चालू असणाऱ्या सातशे पन्नासाव्या जन्मशताब्दी वर्षा निमित्त पन्नास ज्ञानेश्वरी ग्रंथ म ोफत वाटपाचा आगळा वेगळा उपक्रम हाती घेतला असून, आजवर ज्यांच्या घरात ज्ञानेश्वरी पोहोचलेली नाही, ज्ञानेश्वरी वाचनाचे स्वर घुमले नाही, ज्यांना आयुष्यात ज्ञानेश्वरीची वाचन आणि श्रवण साधना घडली नाही. अशा घरात ज्ञानेश्वरीचा प्रचार , ▶ उर्वरित पान २ वर




*बीड जिल्हा वकील संघाच्या निवडणुकीत मतदान करताना ॲड.अजित देशमुख.*